**वाटचाल**
**ग्रामविकासाकडे...**

# सामान्य प्रशासन विभाग













वाटचाल
ग्रामविकासाकडे...
Zilla Parishad, Organisation Chart
Chief Executive Officer
Additional Chief Executive Officer
Dy.CEO GAD & MR
Dep. CEO Village Panchayat
Dep CEO Mahila Balkalyan
Education Officer Primary
Education Officer Secondary
DAHO
Executive Engineer Water Dept
Executive Engineer Works Dept
Agriculture Development Officer
CAFO
Social Welfare Officer
Section Officer
Office Superin-tendent
EDP Dept In Charge
Officer Superin-tendent
Senior Assist.
DHO
ADH O
RCHO
ADMIN Officer
Section Officer
Office Superin-tendent
Section Officer
Deputy Education Officer
Superin-tendent cl-II
Extension Officer
Section Officer
Dy.E.O.
Extension Officer
Section Officer
Dy.Edu. Inspector
AHO Tech
Section Officer
Office Superin-tendent
Section Engineer
Asst. Account Officer
Dy.Ex. Engineer
Section Engineer
Office Superin-tendent
Asst. A/c. Officer
District Agricul-tural officer
Section Officer
Senior Assistant
Senior A/cs. Officer
A/cs. Officer
Asst. A/cs. Officer
Office Superin-tendent
Asst. A/cs. Officer

# सामान्य प्रशासन विभाग

प्राचीन काळापासुन **"पंचायत"** ही भारतीय समाजशास्त्राच्या इतिहासातील सर्वात जूनी व लोकशाहीमधील आद्य संकल्पना आहे. अलीकडील काळात पंचायत राज व्यवस्था भारताच्या ग्रामीण भागातील व सामाजिक व आर्थिक बदलांचे महत्वपूर्ण अंग असल्याचे अधोरेखित झाले आहे. ग्रामीण विकासासाठी पंचायत राज संस्थांचे महत्व सर्व वयोगटातील जनता, लोकप्रतिनिधी, राजकीय विचारवंत व प्रशासनाने मान्य केल्याचे दिसून येते.

भारताने २६ जानेवारी १९५० पासून राज्य घटनेनुसार प्रजासत्काक राज्य व्यवस्था स्विकारली. राज्य घटनेने लोक कल्याणकारी राज्याचे तत्व स्विकारलेले आहे. ग्रामीण विकासामध्ये स्थानिक जनतेचा सहभाग वाढविण्याच्या हेतूने स्वातंत्र प्राप्तीनंतर पंचायत राज संस्थांची संकल्पना मांडण्यात आली. त्यानुसार केंद्र शासनाने बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली. बलवंतराय मेहता समितीने सन १९५७ मध्ये त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. मेहता समितीच्या अहवालाच्या आधारे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी २ ऑक्टोबर १९५९ रोजी सर्वप्रथम राजस्थानमध्ये पंचायत राज व्यवस्थेची सुरुवात केली. महाराष्टामध्ये मेहता समितीच्या अहवालाचा अभ्यास करण्यासाठी वसंतराव नाईक समितीची नेमणूक करण्यात आली. नाईक समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये १ मे १९६२ रोजी त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था लागू करण्यात आली.

महाराष्ट्रामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे कामकाज **महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१** नुसार आणि ग्रामपंचायतींचे कामकाज **मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८** नुसार चालविण्यात येते.

# त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था

**जिल्हा परिषद**

↓

**पंचायत समिती**

↓

**ग्रामपंचायत**

केंद्रशासनाने सन १९९३ मध्ये ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे सत्तेचे विकेंद्रीकरण करुन पंचायत राज संस्थाना घटनात्मक दर्जा दिलेला आहे. स्थानिक गरजा व उपलब्ध साधन संपत्तीच्या आधारे गावाच्या विकासाचे नियोजन करण्याचे संपुर्ण स्वातंत्र्य ग्रामपंचायतींना प्राप्त झाले, परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडून येत असून आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेमध्ये जनतेचा सहभाग वाढल्याचे आढळून येत आहे.

केंद्राने पंचायत राज संस्थांच्या कार्यप्रणालीमध्ये मुलभूत बदल करुन राज्य शासनांनी कायद्यामध्ये आवश्यक बदल करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन दिली आहेत.

## ७३ व्या घटना दुरुस्तीद्वारे करण्यात आलेले महत्वाचे बदल

१. राज्य निवडणूक आयोगामार्फत दर ५ वर्षानी सर्व स्तरातील पंचायत राज संस्थांच्या निवडणूका घेणे.

२. त्रिस्तरीय पंचायत राज संस्थांमध्ये सर्व स्तरांवर महिला व मागासवर्गीयांसाठी आरक्षण.

३. दर ५ वर्षानी राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात यावी. नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेणे.

४. घटनेच्या ११ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेले २९ विषय पंचायत राज संस्थांकडे हस्तांतरीत करणे.

५. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेची स्थापना करणे अनिवार्य आहे.

## महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार जिल्हा परिषदेमधील विषय समिती व सभापती

| अ.क्र. | विषय समिती | | सभापती |
|---|---|---|---|
| १. | स्थायी समिती | - | अध्यक्ष, जिल्हा परिषद |
| २. | जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती | - | अध्यक्ष, जिल्हा परिषद |
| ३. | अर्थ समिती | - | उपाध्यक्ष, जिल्हा परिषद |
| ४. | बांधकाम समिती | - | उपाध्यक्ष, जिल्हा परिषद |
| ५. | समाज कल्याण समिती | - | जिल्हा परिषद सदस्य (अनु.जाती/जमाती) |
| ६. | शिक्षण व क्रीडा समिती | - | जिल्हा परिषद, सदस्य |
| ७. | आरोग्य समिती | - | जिल्हा परिषद, सदस्य |
| ८. | कृषि समिती | - | जिल्हा परिषद, सदस्य |
| ९. | पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती | - | जिल्हा परिषद, सदस्य |
| १०. | महिला व बाल कल्याण समिती | - | जिल्हा परिषद, सदस्य (महिला) |

## सामान्य प्रशासन विभागाकडील महत्वाचे कामकाज –

१) जिल्हा परिषदेकडील वर्ग ३ (लिपीक) व वर्ग ४ कर्मचा-यांचे आस्थापना विषयक (नियुक्ती ते सेवा निवृत्ती) संपूर्ण कामकाज. जिल्हा परिषदेच्या विभागांकडील सर्व संवर्गातील कर्मचा-यांवर प्रशाकीय नियंत्रण ठेवणे.

२) जिल्हा परिषदेकडील सभा विषयक कामकाज.

३) म. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवतीने जिल्हा परिषदेतील सर्व विभागांवर प्रशासकीय नियंत्रण व देखरेख ठेवणे.